**तातडीचे / कालमर्यादित**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/२/कावि/३२/२०१७
दि. १३/०२/२०१७

विषय :- नागरिकांची सनद प्रसिध्द करणेबाबत...
संदर्भ :- १.) क्र.पीएमसी-३०१६/प्र.क्र.९९/नवि-२२ दि.०२/०२/२०१७
२.) आदेश.क्र.नासुके/१/कावि/११/२०१४ दि.०६/०१/२०१४

**परिपत्रक**

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नागरिकांची सनद प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच प्रसिध्द केलेली **"नागरिकांची सनद"** ही शासन तथा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सुधारित धोरण, वर्षाच्या २ मे रोजी प्रत्येक विभागाकडून अद्ययावत करण्याचे आदेश निर्गत करणेत आले आहे. त्यानुसार शासन पत्र क्र.पीएमसी-३०१६/प्र.क्र.९९/नवि-२२ दि.०२/०२/२०१७ अन्वये नागरीकांची सनद तयार करून शासनास तात्काळ पाठवणेबाबत कळविले असुन सर्व संबंधित विभागांनी नागरिकांची सनद मध्ये हरकती किंवा सूचना असल्यास, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचे स्थानांतरण/सेवानिवृत्त असे झालेल्या बदलानुसार नागरिकांची सनद वेबपोर्टलद्वारे अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपणामार्फत नागरिकांची सनद वेबपोर्टलद्वारे अद्ययावत करुन माहिती नागरी सुविधा केंद्र विभागात ईमेल द्वारे **Unicode Font** मध्ये पाठविणेत यावे.

महाराष्ट्र शासनास अहवाल पाठविण्यासाठी सर्व विभागांनी केलेल्या कार्यावाहीचा अहवाल **दि.०१/०३/२०१७** पर्यंत नागरी सुविधा केंद्र विभागास सादर करावा. ज्या विभागांची माहिती विहित कालावधीमध्ये प्राप्त होणार नाही त्याचा आढावा विभागप्रमुखांच्या बैठकीमध्ये घेतला जाणार आहे याची नोंद घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी आपली माहिती खालील विवरणपत्रात हार्ड आणि सॉफ्ट कॉपी मध्ये भरून नागरी सुविधा केंद्र विभागात पाठविण्यात यावी, ही विनंती.

| अनु.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरावण्याची विहित मुदत. | सेवा मुदतीत न पुरविल्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव हुद्दा. |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८

प्रति,

विभागप्रमुख / शाखाप्रमुख
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी - ४११ ०१८